**स.फौ.के. नं. ३६८/२०२२**

**नि. क्र. २३**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – जान्हवी जयदिप कांगणे,

**वय** – ३७ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (महिला पोलीस नाईक/१४२०),

**सध्या नेमणूक** – पोलीस ठाणे देवरुख, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून** –

**०१**. दिनांक ०७/१०/२०२२ रोजी मी पोलीस ठाणे देवरुख येथे कार्यरत होते. त्यादिवशी पो.ना./९४७ श्री. एस. डी. जाधव यांना विश्वसनीय बातमी मिळाली की, पांगरी, मोठीवाडी, ता. संगमेश्वर येथे काही लोक विना परवाना अवैधरित्या गावठी हातभट्टी विक्रीचा व्यवसाय करतात.

**०२**. सदरची बातमी पोलीस निरीक्षक यांना कळवुन मी, पो.ना./९४७ श्री. एस. डी. जाधव, पो.शि./६८० श्री. सुतार असे खाजगी वाहन क्रमांक एमएच–०८–एएन–५९४७ ने पांगरी ग्रामपंचायत समोर आलो.

**०३**. तेथे पो.ना./९४७ श्री. एस. डी. जाधव यांनी दोन इसमांना पंच म्हणून बोलावले. त्यांना छाप्याबाबत माहिती दिली. त्यानंतर पंच व आम्ही पोलीस असे पांगरी मोठीवाडीकडे जाणाऱ्या पाय वाटेने प्रोव्ही वॉच करीतस एका घराच्या पाठीमागील परसात खोपीच्या आडोशाला एक इसम त्याच्या पुढयात कॅन घेवून बसलेला आम्हाला दिसला. आम्हाला त्याचा संशय आला. पो.ना./९४७ श्री. एस. डी. जाधव यांनी त्याला जागीच १९:०० वाजता धरले. आम्ही त्याच्याकडील बाबींची पाहणी केली असता त्याच्या ताब्यात २० लिटर मापाचा सफेद रंगाचा एक प्लॅस्टीक कॅन व ०१ काचेचा पेला मिळून आला. आम्ही त्या कॅनची खात्री केली असता त्यात १८ लिटर गावठी दारु होती.

**०४**. आम्ही पंचांसमक्ष त्या इसमाला त्याचे नाव–गाव विचारले असता त्याने

त्याचे नाव योगेश गजानन म्हादे, राहणार – पांगरी, गाव ठानवाडी असे सांगितले.

**०५.** त्याठिकाणी पो.ना./९४७ श्री. एस. डी. जाधव यांनी पंचांसमक्ष १८० मिली क्षमतेच्या एका बाटलीत मिळून आलेल्या मुद्देमाल दारुपैकी काही दारु रासायनिक पृथःकरणाकरीता काढून घेतली. त्या नमूना बाटलीला व कॅनला पंचांच्या व पोलीसांच्या सहयाचे लेबल चिकटविले. त्याठिकाणी मिळून आलेला मुद्देमाल ताब्यात घेतला. तेथे त्याबाबत पंचांसमक्ष पंचनामा केला.

**०६.** त्यावेळी मी माझ्या खाजगी मोबाईलवर छायाचित्रे घेवुन त्याची प्रींट तपास अधिकारी यांच्याकडे भा.पु.का.कलम ६५–ब अन्वये प्रमाणपत्रासह जमा केले. *(साक्षीदारास प्रकरणातील छायाचित्रे दाखविण्यात आली). त्यामध्ये आरोपी, दोन पंच, फिर्यादी व तपासीक अंमलदार असे दिसत आहेत. (सदर **छायाचित्रांना ओळखीकरीता एकत्रीतपणे वस्तु – अ** देण्यात येते). (साक्षीदारास भा.पु.का.कलम ६५–ब अन्वये प्रमाणपत्र दाखविण्यात आले). ते तेच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.(सदर **दस्ताला निशाणी क्रमांक २४** देण्यात येते).*

**०७.** त्यानंतर आम्ही मिळून आलेल्या मुद्देमालासह पोलीस ठाणे येथे परत आलो. तेथे आल्यावर पो.शि./६८० श्री. सुतार यांनी आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली. आरोपी व मुद्देमाल दाखविल्यास मी ओळखू शकते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. *(मुद्देमाल न्यायालयात जमा नाही).*

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेकडून –**

**०८.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे, छाप्याकामी वापरण्यात आलेल्या खाजगी वाहनाचा कोण मालक होता, हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे तपासटिपण नोंदविताना मी पंचांची नावे सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पांगरी मोठीवाडी येथे अनेक राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर छाप्याकामी किती वाजता निघालो, ही बाब माझ्या तपास टिपणात नमुद केली नाही. हे

म्हणणे खरे आहे की, तथाकथीत लाकडी खोपीच्या मालकीबाबत मी माझे तपासटिपण नोंदविताना सांगितले नाही.

**०९**. हे म्हणणे खरे आहे की, मोबाईल मालकीबाबतचा कागदोपत्री पुरावा मी तपासीक अधिकारी यांच्याकडे दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोबाईलचा आयईआयएम क्रमांक माझ्या तपासटिपणात नमुद केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रमाणपत्रात प्रींटर त्यावेळी चालु स्थितीत होता, ही बाब व प्रींटरचा क्रमांक नमुद केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे प्रमाणपत्र मी खोटे दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही घटनास्थळी गेल्याचे मी सरतपासात खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.03.11 14:45:02 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,**

**जि. रत्नागिरी.**

**दिनांक –१०.०३.२०२६**

**स्थळः देवरुख**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 10/03/2026 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 10/03/2026 |
| Evidence uploaded on | : | 10/03/2026 |